वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.NO.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि.१२ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## भाजपाने संग्राम जगतापला मोहरा करून अजित पवारांची राष्ट्रवादी आगामी निवडणूकीत संपविण्याचे ठरविलेकी काय?

# संग्राम जगताप म्हणजे नासलेलं बेणं...!

# राज्यभरात जातीयवादाला खतपाणी घालतय

संग्राम जगतापांनी अजित पवारांच्या नोटीसीला लाथ मारत अजित पवारांना राज्यभरात जनते समोर तोंडावर पाडले



Email:- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

## भाजपाच्या या खेळीमुळे अजित पवारांची मोठी अडचण निर्माण झाली, ओकता येईना आणि निघळताही येईना

## जनआक्रोश मोर्चामुळे मुस्लिम मतदारात मोठा आक्रोश, याच्यामुळे थेट परिणाम निवडणूकीतील उमेदवारांवर होणार

## उध्दव ठाकरेंची शिवसेना संपविण्याचा विडा जसे शिंदेंनी उचलला होता तसाच अजित पवारांची राष्ट्रवादी उध्वस्त करण्याचा विडा संग्राम जगतापांनी उचलला

### आपले दोन-चार जण आत गेले तरी चालेल, पण धर्माच्या रक्षणासाठी मुस्लिमांना उत्तर द्या; जगताप पुन्हा बरळले

अहमदनगर , (दिव्य न्युज):- राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवारांनी समजावून, नोटीस पाठवूनही संग्राम जगतापांवर काहीच परिणाम झाल्याचं दिसत नाही. पक्षाच्या नोटिशीनंतरही त्यांचे मुस्लिम विरोधात ▶▶ पान २ वर

### दोन समाजामध्ये तेढ लावली

'आम्ही भारतीय नागरिक आहोत. संविधान मानतो, आम्ही संविधानाला मानणारे लोक आहोत. तुम्ही आमचे परीक्षा पाहू नका, त्यांनी साधा फरीद खानचा सुद्धा निषेध केला नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारून आम्ही, हा जिल्हा संविधानावर चालवतो, असा संदेश संपूर्ण देशाला दिलेला आहे. याच महामानवाच्या पुतळ्याचा अवमान फरीद खान याने वैयक्तिक भांडणांतून केला. दोन समाजामध्ये तेढ लावण्याचा प्रकार केला. जिरवा जिरवीच्या प्रकारांमध्ये याच बोकडांचीच जिरली. पोलिसांनी दमदार कामगिरी केली आणि त्याला अटक केली,' असे आमदार जगताप यांनी सांगितले.

## 'चिकणी चमेली'ला 'खुराड बोकड'नं प्रत्युत्तर

### ओवैसी, जलीलांना संग्राम जगतापांचा 'डेमोग्राफिक जिहाद'वर घणाघात

मुंबई , (दिव्य न्युज):- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांनी -खचखचचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी आणि प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांना जशाच तसं उत्तर दिलं आहे.

'खुराड बोकड' म्हणत, थेट असदुद्दीन ओवैसी आणि इम्तियाज जलील यांच्यावर आमदार जगताप यांनी निशाणा झाला. अहिल्यानगरमधील मुकुंदनगर भागात झालेल्या '-खचखच'चे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी आमदार जगतापांवर 'चिकणी चमेली' म्हणत निशाणा साधला होता ▶▶ पान २ वर

### मुस्लिमांसाठी भारत युद्धाचं घर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुस्तकात लिहून ठेवलंय पडळकरांचे खळबळजनक विधान!

मुंबई , (दिव्य न्युज):- भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर नेहमीच वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत असतात. याआधी त्यांनी केलेल्या काही विधानांमुळे मोठा वाद निर्माण झालेला आहे. असे असतानाच आता अहिल्यानगरातील एका सभेत पडळकर यांनी मोठे विधान केले आहे. मुस्लीम भारताला युद्धाचं घर मानतंत असं डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या पुस्तकात लिहिलेलं आहे, असा खळबळजनक दावा पडळकर यांनी केला आहे. त्यांच्या या विधानानंतर आता राज्यात नव्या वादाला तोंड फुटू शकते. मुस्लिमांना राष्ट्र प्रथम नाही तर इस्लाम प्रथम आहे, असेही पडळकर म्हणाले आहेत.

जी मुस्लीम राष्ट्रे आहेत, ते मुस्लिमांना इस्लामचं घर वाटतं. जे देश मुस्लीम राष्ट्रं नाहीत ते मुस्लिमांना युद्धाचं घर वाटतं. म्हणजेच मुस्लिमांसाठी भारत हा देश युद्धाचं घर आहे, असं मी म्हणत नाही. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबडेकर यांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी फाळणी होण्यापूर्वी जे पुस्तक लिहून ठेवले आहे, त्यात तसे लिहिण्यात आले आहे, असा दावा गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. तसेच जगातले मुस्लीम जी भूमिका घेतात त्या भूमिकेला भारतातील मुस्लीम प्राधान्य देतात, असेही विधान पडळकर यांनी केले आहे.गोपीचंद पडळकर यांनी माजी मंत्री तथा आमदार जयंत पाटील यांच्या आई-वडिलांविषयी ▶▶ पान २ वर

## आ.संग्राम जगतापांना कारणे दाखवा नोटीस

### वादग्रस्त विधानावरून अजित पवार नाराज, वक्तव्यावर स्पष्टीकरण

मुंबई , (दिव्य न्युज):- सोलापूर येथे झालेल्या हिंदू आक्रोश मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांनी केलेले विधान चुकीचे असून त्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावणार आहे, असे राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. आमदार जगताप यांनी 'दिवाळीची खरेदी फक्त हिंदूंकडूनच करा,' असं वक्तव्य केलं होतं. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांच्या पाहणीनंतर अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला यावेळी त्यांनी जगतापांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली.

अजित पवार म्हणाले, 'पक्षाची ध्येय-धोरणे ठरल्यानंतरही पक्षाच्या विचारधारेपासून ▶▶ पान २ वर

### नोटीस बजावून काहीच होणार नाही पक्षातून हकालपट्टी कराच-खा. सुप्रिया सुळे



मुंबई, (दिव्य न्युज):- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदार संग्राम जगताप यांच्या हिंदुत्वादी भूमिका पक्षाला आता जड जाऊ लागली आहे. अजित पवार ▶▶ पान २ वर

## आ.संदीप क्षीरसागरांकडे नगराध्यक्ष पदासाठी स्वच्छ प्रतिमेचा चेहरा सचिन आप्पा सोनवणे

### सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारा चेहरा



बीड, (दिव्य न्युज):- बहुचर्चित असलेली बीड नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची जागा ही अनुसूचित जाती (महिला) साठी सुटली आहे. या पदासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे सचिन आप्पा सोनवणे यांना उमेदवारी देण्याची मागणी समाजातून होत आहे.

या निवडणुकीसाठी अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार होते. मात्र बीड ची जागा ही अनुसूचित जाती (महिला) साठी राखीव ठेवण्यात आल्याने अनेकांच्या स्वप्नावर पाणी फिरल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. बीड शहरात सर्व पक्षांकडे या पदासाठी उमेदवार आहेत. मात्र त्यात एक चेहरा नगराध्यक्ष पदासाठी डोळ्यासमोर येतो तो म्हणजे आ.संदीप क्षीरसागर यांचे एकनिष्ठ आणि खंदे समर्थक सचिन आप्पा सोनवणे.

त्यांनी २००१ ते २०११ या काळात नगर पालिकेचे नगरसेवक, पाणी पुरवठा सभापती, जिल्हा नियोजन सदस्य म्हणून काम केले आहे. त्यांच्याकडे नगर पालिकेत काम करण्याचा दांडगा ▶▶ पान २ वर

### आ. संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश

## शहरातील बायपास वळणावर दोन पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्ता जोडणीच्या कामाला सुरुवात



बीड , (दिव्य न्युज):-बीड शहरातून जात असलेल्या आणि उत्तर दक्षिण जोडणारा धुळे सोलापुर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. यात जड वाहतकीचे प्रमाण देखील जास्त असते. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बायपास रस्त्यावरील शहरात वळणावर नेहमी अपघात होत होते. यामुळे संभाव्य अपघात टळले पाहिजेत आणि नागरिकांचे जीव वाचले पाहिजेत त्यामुळे या वळणावर पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्त्याची जोडणी अत्यंत महत्त्वाची होती. ▶▶ पान २ वर

## खोक्या भोसलेच्या मेहुणीचे अपहरण

### पत्नी तेजू भोसलेने सांगितला रात्रीचा थरार

बीड , (दिव्य न्युज):- सतीश भोसले उर्फ खोक्याच्या कुटुंबाला मध्यरात्री मारहाणीची घटना समोर आली आहे. बीडच्या शिरूर कासार शहराजवळ ही मारहाण करण्यात आली. रात्री १० ते १५ जणांचे टोळके आले आणि त्यांनी गंभीर मारहाण केली तसेच माझ्या अल्पवयीन बहिणीला देखील उचलून घेऊन गेले, असा आरोप सतीश भोसले उर्फ खोक्या याची पत्नी तेजू भोसले यांनी केला आहे. सध्या जखमेवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे.सतीश भोसले उर्फ खोक्याच्या कुटुंबावर मध्यरात्री दहा ते बारा जणांनी ▶▶ पान २ वर



### मा. जि. प सदस्य भगवानराव खेडकर यांचे दु:खद निधन



चकलांबा , (दिव्य न्युज):- चकलांबा येथील मा.जिल्हा परिषद सदस्य भगवानराव खेडकर पाटील यांचे ७६ व्या वर्षी दि.१२ ऑक्टोबर २०२५ रविवार रोजी सकाळी ६:३० मि.वाजता दुःखद निधन झाले. छ.संभाजीनगर या ठिकाणी त्यांच्यावर उपचार सुरू होते व उपचार दरम्यान त्यांची प्राणज्योत मावळली.चकलांबा आणि परिसरातील राजकारणात किंगमेकर म्हणून ओळखले जाणारे तात्या हे अत्यंत प्रेमळ आणि शांत स्वभावाचे एक पान २ वर

# शैक्षणिक जाणीवेसाठी कोशिश फाऊंडेशन आणि मॅक्सक्युअर हॉस्पिटलचा उपक्रम

बीड, (दिव्य न्युज):- मुस्लिम समाजामध्ये शिक्षणाचे महत्त्व वाढवण्यासाठी आणि शैक्षणिक स्तर सुधारण्यासाठी कोशिश फाऊंडेशन आणि मॅक्सक्युअर हॉस्पिटलचे संचालक डॉ. फिरोज शेख यांनी एक महत्वाकांक्षी पुढाकार घेतला आहे. समाजातील सुशिक्षित व बुद्धिजीवी वर्गाने एकत्र येऊन समाजातील शैक्षणिक समस्यांवर चर्चा करून त्या सोडवण्यासाठी उपाययोजना आखाव्यात, असे आवाहन डॉ. फिरोज सर यांनी केले. या अनुषंगाने आज किंग्ज पॅलेस, इफ्तेखार नगर, मॅक्सक्युअर हॉस्पिटल शेजारी, टेलगाव नाका, बीड येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीचे अध्यक्षस्थान शफीक हाश्मी सर यांनी भूषवले. त्यांनी समाजातील शैक्षणिक प्रश्नांवर मौल्यवान मार्गदर्शन केले आणि सकारात्मक बदलासाठी ठोस सूचना दिल्या. बैठकीत इम्रान सर यांनी समाजात शिक्षणाच्या अभावाची मूळ कारणे विशद केली, काजी मकदूम सर यांनी एकत्रित प्रयत्नांद्वारे या समस्या सोडवण्याचे महत्त्व अधोरेखित केले, तर इंजि. जावेद सर यांनी काही व्यवहार्य उपाय आणि कार्ययोजना मांडल्या.





याशिवाय अनेक मान्यवर व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी आपले विचार आणि सूचना बैठकीत मांडल्या. बैठकीच्या शेवटी डॉ. फिरोज शेख यांनी सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानत एकत्रितपणे समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पुढील काही महिन्यांसाठी ठोस कार्ययोजना निश्चित केली.या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले -घराघर जाऊन शैक्षणिक जनजागृती मोहीम ,नुक्कड मिटिंग्स व चर्चा सत्रांचे आयोजन, विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम,पालक व विद्यार्थी काउन्सेलिंग सत्रे,शाळांसोबत ऑनलाईन मिटिंग्स,स्पर्धा परीक्षांची तयारी केंद्रे, नवीन अध्ययन केंद्रांची स्थापना या उपक्रमातून समाजात शिक्षणाबाबत जागरूकता वाढवणे, विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देणे आणि शैक्षणिक दर्जा उंचावणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे डॉ. फिरोज शेख यांनी सांगितले. या कार्यक्रमास यशस्वी करण्यास, अस्लम अन्वरी, शफिक फारूकी, अब्दुल वकील सर, मुशताक अन्सारी सर, शेख निजाम यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

पान ४ वरून

## आई-बाबा मला

आम्ही कुटुंबाला एच एल ए टायपिंग ऑफर केले आणि ते हॅप्लोइडेंटिकल वडिलांशी मॅच असल्याचे आढळले. प्रत्यारोपणासाठी निवडलेल्या वडिल शंकर जाधव दात्याने दान केलेल्या बोन मॅरोचा वापर करण्याची आमची योजना आहे. प्रत्यारोपण केले जात आहे. सहाय्यक संकल्प इंडिया फाउंडेशन कडून ना-नफा तत्वावर पॅलेंटला ही सेवा देण्यात आली आहे. प्रत्यारोपणाचा एकूण खर्च सुमारे १५,००,००० रुपये असेल (फक्त पंधरा लाख रुपये). खर्चात हे समाविष्ट आहे: प्रत्यारोपणापूर्वीचे काम औषधे आणि डिस्पोजेबल,निदान,खोलीचे शुल्क ज्यामध्ये डॉक्टरांचे शुल्क, नर्सिंग शुल्क, बॉडी शुल्क, जेवणाचे शुल्क आणि इतर विविध हॉस्पिटलायझेशन शुल्क समाविष्ट आहे.प्रक्रिया शुल्क प्रत्यारोपणानंतरचा पाठपुरावा प्रत्यारोपणासाठी हा एक पॅकेज खर्च आहे आणि जीवघेणा संसर्ग झाल्यास वाढू शकतो कारण प्रत्यारोपणादरम्यान संसर्गावर उपचार करण्यासाठी वापरले जाणारे एजंट महाग असतात. प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले पैसे तयार होताच आम्ही मुलाला प्रत्यारोपण करण्याची योजना आखत आहोत. कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत कृपया माझ्याशी संपर्क साधावा

डॉ. डि. एम.मोहना रेड्डी ( बेंगलोर )

## बीड नगर पालिकेत

आपलाच उमेदवार हा १० हजार मताने निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व जागेवर नगरसेवक निवडून येतील. आमदारकीच्या निवडणुकीत सोबत राहिलेल्या आणि माझ्यासाठी एकनिष्ठ प्रामाणिक राहून काम करणाऱ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांसाठी घरातला सदस्य समजून काम करून निवडून आणणार ते असल्याचे सांगून कार्यकर्त्यांना बळ दिले यावेळी आ.संदीप क्षीरसागरांना देखील कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्या जो उमेदवार देतील त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिवाळीआधी

आहेत. म्हणजेच, अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना आता २० किलो तांदूळ, साडेसात किलो गहू आणि साडेसात किलो ज्वारी मिळणार आहे. प्राधान्य कुटुंबातील शिधापत्रिकाधारकांना एक युनिटसाठी एक किलो गहू, एक किलो ज्वारी आणि तीन किलो तांदूळ असे प्रमाण ठरविण्यात आले आहे. स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत याचे वितरण सुरू आहे.

पान १ वरून

## आपले दोन-चार

वक्तव्यं सुरूच आहे. आताही अहमदनगरमध्ये त्यांनी तशाच पद्धतीचं वक्तव्य केलं. आता आपल्याला हा देश, धर्म सुरक्षित ठेवायचा आहे, त्यामुळे आपले पण दोन-चार लोक आत गेले तरी हरकत नाही, पण लोकांना आता प्रत्युत्तर द्या असं जाहीर आवाहन त्यांनी केलं.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांनी मुस्लिमांकडून कोणतीही खरेदी करू नका अस वक्तव्य केलं होतं. त्यानंतर अजित पवारांनी त्यावर नाराजी व्यक्त करत त्यांना नोटीसही पाठवली. पण त्याचा काहीच परिणाम झाला नाही. अहिल्यानगर इथल्या शिवशक्ती भीमशक्ती जनआक्रोश मोर्चामध्ये त्यांनी मुस्लिम समूदायाच्या विरोधात पुन्हा वादग्रस्त वक्तव्य केलं.अहिल्यानगरमध्ये काही दिवसांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात आक्षेपार्ह पत्रक भिरकवल्याच्या निषधार्थ मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये आमदार संग्राम जगताप आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर सामील झाले.आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगरमध्ये नवरात्रोत्सव काळात णीवपूर्वक काही फलक लावण्यात आले. या फलकांच्या माध्यमातून तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जातो. काही दिवसांपूर्वी रस्त्यावर गोमांस टाकण्यात आले होते. त्यावेळी आमची मागणी होती की आरोपी अटक करावी.

आपल्याला आश्वासन मिळाल्यानंतर आपण लगेच रस्ता रोको मागे घेतला. पण त्यानंतर एक घटना घडली आणि मुस्लिम रस्त्यावर जाऊन बसले.पण पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असताना ते रस्त्यावरून उठायला तयार नव्हते. मग त्यांना काय इथे सिरीया कायदा हवा आहे का? त्यांना वाटलं आपली गर्दी पाहून पोलीस घाबरतील. मात्र पोलीस प्रशासनाने त्यांना त्यांची जागा दाखवण्याचे काम केले.काही दिवसांपूर्वी एमआयएमचे बोकड आपल्या अहिल्यानगरमध्ये आले होते. हे बोकड आले आणि बडबड करून करून गेले. अहिल्यानगर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान झाला मग त्यांनी याचा निषेध केला का? असा प्रश्न आमदार संग्राम जगताप यांनी विचारला.संग्राम जगताप म्हणाले की, हे लोक अजिबात संविधान मानत नाहीत. दोन समाजात तेढ निर्माण करण्यासाठी एका मुस्लिम युवकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ पत्रक भिरकावले. पण पोलिसांनी तातडीने त्याला ताब्यात घेतलं. ईद वेळी एक पत्रक हे लोक वाटतात. ज्यावर लिहिलंय की ईदची खरेदी आपल्याकडून करा, आपले लोक जकात काढतील तर बाकीचे लोक हत्यार काढतील असा उल्लेख आहे. आपल्याच लोकांकडून खरेदी करा हे सांगायची सुरुवात त्यांनीच केली.

संग्राम जगताप म्हणाले की, भारताची क्रिकेट टीम कोणत्याही टीम कडून सामना हरला की ही पिलावळ फटाके वाजवतात. ही कोणती काल्पनिक गोष्ट नाही, याबाबत पोलीस तक्रार झाली आहे. मागे जी पूर परिस्थिती निर्माण झाली त्यावेळी या लोकांनी दिखाऊ पद्धतीने मदत केली. मनपात जेव्हा सर्वसाधारण सभा होते त्यावेळी राष्ट्रगीत सुरू झाले की, हे लोक उठून जातात. जे लोक सभागृहात असतात ते उठून उभा राहात नाहीत तर मोबाईलवर बघत खालीच बसून राहतात. त्यामुळे राष्ट्रगीत म्हणणारे आणि राष्ट्रगीत सुरू झाल्यावर उभा राहणारे लोक सभागृहात आले पाहिजे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी

वादग्रस्त विधान केले होते. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाकडून पडळकरांचा निषेध करण्यात आला होता. प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करण्यात आले होते. पडळकर यांनी जयंत पाटील यांच्या आई-वडिलांच्या चारित्र्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. या प्रकरणानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पडळकरांना समज दिली होती. तरीदेखील पडळकर यांनी पुढच्या काही भाषणांत जयंत पाटलांवरील टीका कमी केली नव्हती.आता जयंत पाटील यांच्यावर केलेल्या टीकेचा मुद्दा मागे पडलेला असताना पडळकर यांनी नवे विधान केले आहे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकाचा हवाला देत त्यांनी मुस्लीम धर्मीयांबद्दल विधान केले आहे. त्यामुळे आता नेमके काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## 'चिकणी चमेली'ला

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबनाचा प्रकार झाला होता. या प्रकरणी पोलिसांनी एका मुस्लिम युवकाला अटक केली आहे. या विटंबनेच्या प्रकाराच्या निषेधासाठी आज अहिल्यानगरमध्ये जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. आमदार जगताप यांच्यासह भाजप (इगझ) आमदार गोपीचंद पडळकर देखील मोर्चात सहभागी झाले होते.

संग्राम जगताप यांच्या हिंदुत्ववादी भूमिकेवर पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार प्रचंड नाराज आहे. त्यांनी पक्षातर्फे नोटीस बजावली आहे. तसंच हिंदुत्वाच्या भूमिकेच्या नावाखाली धार्मिक भावना दुखवल्याप्रकरणी अकोला इथं संग्राम जगताप यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. तसंच खासदार सुप्रिया सुळे यांनी नोटिशींपेक्षा हकालपट्टी करा, अशी मागणी अजित पवारांकडे केली आहे.

यामुळे आजच्या सभेत संग्राम जगताप यावर काय भाष्य करतात, काय भूमिका घेतात, याकडे लक्ष लागले असतानाच, त्यांनी पुन्हा विशिष्ट समाज म्हणत 'डेमोग्राफिक जिहाद'वर घणाघात केला. '-खचखच'चे प्रमुख असदुद्दीन ओवैसी आणि प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्यावर आमदार जगतापांनी जोरदार निशाणा साधला.

संग्राम जगताप यांनी, 'पश्चिम बंगाल आणि मालेगावची उदाहरणे देत, 'डेमोग्राफिक जिहाद' कसा असतो, यावर भाष्य करताना, आज मालेगावमध्ये '-खचखच'चा आमदार आहे. मालेगावमध्ये पूर्वी काँग्रेसची लोक निवडून येत होती. त्यांच्या सर्व समावेशक भूमिकेमुळे हळूहळू तिथं त्यांची लोकसंख्या वाढली, मतदार वाढले, आणि आता तिथं '-खचखच'चा आमदार आहे, ही '-खचखच'ची बोकडं अहिल्यानगरमध्ये येऊन गेली,' असा घणाघात केला.आमदार जगताप म्हणाले, एक हैदराबाद येथून मोठं 'खुराड बोकड' आलं, तर दुसरे छत्रपती संभाजीनगर इथून दुसरं बोकड आलं. मला या बोकडांचा आवाज काढता येत नाही. ही बोकड आली, पण काहीतरी बडबड करत राहिलं. आणि ती केली पण पाहिजे. नाही बोलले, तर आपल्याला लोक विचारणार नाही. पूर्वी ही भाषणामध्ये एक डायलॉग मारायचे, पंधरा मिनिटं पोलिस हटाव, आता ती भाषा बदलली आहे. आता आम्ही म्हणतो आम्हाला पाच मिनिटं पाहिजेत. पंधरा मिनिटं लागत पण नाहीत, पाचच मिनिटं सांगतो.

## नोटीस बजावून काहीच

यांनी पक्षाकडून संग्राम जगताप यांना नोटीस बजावल्याची सांगत सावरासावरी केली आहे.

परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी टायमिंग साधत, संग्राम जगताप यांची हकालपट्टी करण्याची मागणी करत कोंडी केली आहे. दरम्यान, भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी, संग्राम जगतापांनी राष्ट्रहितासाठी, लोकांसाठी आणि धर्मासाठी भूमिका घेतली आहे. कालही भैय्यांबरोबर होता, आता पुढेही त्यांच्यासोबत आहे, असे सांगून त्यांच्या पक्षाने काढलेल्या नोटिशीवर ती त्यांच्या पक्षाची अंतर्गत बाब आहे, असे म्हटले आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, नुसती नोटीस बजावून काहीच होणार नाही, पक्षातून काढून टाकले पाहिजे, कोणीही व्यक्ती जर समाजात तेढ निर्माण करू, महाराष्ट्राच्या विरोधात, देशाच्या संविधानाविरोधात काम करत असेल, तर अशा व्यक्तीविरोधात स्ट्राँग अॅक्शन झाली पाहिजे. हा देश कोणाच्या मनमर्जीने चालणार नाही. हा देश भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने चालणार आहे.

संग्राम जगताप यांनी हिंदुत्वाच्या भूमिकेवर करत असलेल्या विधानांवर, 'त्यांचे जे विधान येत आहेत, ते महाराष्ट्र, देशाच्या आणि संविधानाच्या विरोधात आहे. त्यामुळे जास्त स्ट्राँग अॅक्शन आम्हाला अपेक्षित आहे. आणि हा विषय राजकारणाचा नाही, तर सामाजिक, भारत आणि महाराष्ट्राच्या ऐक्याचा विषय आहे,' असेही सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

## आ.संग्राम जगतापांना

कोणताही खासदार-आमदार किंवा पक्षाशी संबंधित जबाबदार व्यक्ती, अशा प्रकारची वक्तव्ये करत असेल, तर ते पक्षाला मान्य नाही. अरुणकाका जगताप हयात होते, तोपर्यंत तेथे सर्व सुरळीत होते. संग्राम जगताप यांनी आता जबाबदारीने वागले, बोलले पाहिजे. एका कार्यक्रमात जगताप यांना अशा विधानांबाबत समज दिली होती. त्यावर सुधारणा करेन, असेही त्यांनी सांगितले. मात्र, अशा प्रकारची कोणतीही सुधारणा दिसत नाही,' असं अजित पवारांनी म्हटलं.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार संग्राम जगताप यांना नोटीस बजावण्याचा इशारा दिल्यानंतर, जगताप यांनी पक्षविरोधी घेतलेली आक्रमक हिंदुत्वाची भूमिका आता चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. सध्या जगताप राज्यभर भाजपचे मंत्री नितेश राणे आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या सोबत विविध ठिकाणी आयोजित जनआक्रोश मोर्चांमध्ये सहभागी होत आहेत आणि तेथे प्रखर हिंदुत्ववादी भाषणे करत आहेत.त्यांच्या या भाषणांमधून स्पष्टपणे दिसते की जगताप आता पक्षाच्या भूमिकेपेक्षा भिन्न आणि अधिक तीव्र हिंदुत्वाचा अजेंडा पुढे नेत आहेत. यामुळे त्यांना भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून पाठबळ मिळत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.बाबासाहेब पाटील यांनी शेतकरी आणि कर्जमाफीबद्दल केलेल्या वक्तव्याबद्दल बोलताना पवार अजित म्हणाले, 'बळीराजाबाबत असे वक्तव्य करण्याचे काही कारण नाही. त्यांनी असे वक्तव्य केले असेल तर त्यांच्याशी बोलेन.

## शहरातील बायपास

त्या दोन्ही ठिकाणी पुलांची बांधणी व १२ किलोमीटर च्या रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रस्ता जोडणीच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली. या कामासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता.बीड विधानसभेचे आ.संदीप भैया क्षीरसागर यांनी या सुरू झालेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामासंदर्भात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना करत व सुरू झालेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सूचना दिल्या.

आ.संदीप भैया आणि सय्यद सलीम यांनी खंडपीठात पिटीशन केली होती दाखल

आ.संदिप क्षीरसागर व माजी आमदार सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये यासंदर्भात पिटीशन दाखल केली होती.संदीप क्षीरसागर यांनी या कामाच्या मंजुरीची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी अशी वारंवार मागणी केली होती.तसेच माजी आ.सय्यद सलीम यांनी दोन्ही उड्डाणपूल आणि स्लिप सर्विस रोड मंजुरीसाठी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ११७६/२०२४ व पीटिशन क्रमांक ८८०८/२०२४ दाखल केली होती. याठिकाणी होत असलेले अपघात बघता आणि सुरक्षेच्या प्रश्नांची गंभीर दखल घेत डिसेंबर २०२४ मध्ये तिन्ही कामांना मंजुरी द्या असे निर्देश दिले होते.त्यांच्या या निर्णयाने बायपास वरील सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागणार असून आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.'

## आ.संदीप क्षीरसागरांकडे

अनुभव आहे. विशेष म्हणजे सचिन आप्पा सोनवणे हे स्वच्छ प्रतिमेचा चेहरा असून त्यांच्यावर कसलाही प्रश्न उपस्थित केला जाऊ शकत नाही. एकीकडे आ.संदीप क्षीरसागर यांची अनेक नगरसेवकांनी साथ सोडली मात्र त्यांनी कधीच त्यांची साथ सोडली नाही हे त्यांचे एकनिष्ठ असल्याचे स्पष्ट दिसून येते. सचिन आप्पा सोनवणे यांचे सर्व समजात चांगले आणि मैत्री चे संबंध आहेत. त्यांनी त्यांच्या नगरसेवक आणि पाणी पुरवठा सभापतीच्या काळात अनेक भागात समाजउपयोगी कामे केली आहेत. त्याकाळात त्यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून प्रत्येक समाजातील नागरिकांच्या समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. कुठल्याही महापुरुषांची जयंती असो त्यात ते पुढाकार घेऊन मोठ्या उत्सवात जयंती साजरी करतात. कुठल्याही समाजाचे आंदोलन असो त्यांच्या न्याय हक्कासाठी कायमच त्यांच्या लढ्यात उभे असतात.

पाणी पुरवठा सभापती असताना प्रत्येक प्रभागात नागरिकांना नियमित पाणी देण्याचे काम केले. त्यांचा स्वभाव हा जमेची बाजू त्यांच्यासाठी फायद्याची ठरू शकते. त्यांचे कुठल्याच समाजातील नागरिकांसोबत वैर नाही. प्रत्येक समाजात राहून त्यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून आणि एकनिष्ठ प्रामाणिक सहकारी म्हणून आ.संदीप क्षीरसागर यांनी सचिन आप्पा सोनवणे यांना बीड च्या नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदाची उमेदवारी द्यावी, अशी मागणी सर्व समाज बांधवातून होत आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन आप्पा सोनवणे हे बीड शहराचा विकास करून नगराध्यक्ष पदाला नक्कीच न्याय देतील यात तिळमात्र शंका नाही.

## खोक्या भोसलेच्या

हल्ला केला यात चार महिला जण जखमी आहेत. बीडच्या शिरूर तहसील कार्यालया गायरान जमिनीत हा हल्ला करण्यात आला आहे. आम्हाला न्याय मिळावा, अशी विनंती सरकारकडे केली आहे.

तेजू भोसले म्हणाल्या, रात्री १०-११ वाजता आमच्यावर हल्ला झाला अगोदर एक स्विफ्ट आणि त्यानंतर एक स्कॉर्पिओ आली. गाडीतून १५-२० लोक खाली उतरल्यानंतर आम्हाला म्हणाले, पारध्यांनो तुम्ही इथे कशाला राहिला असं म्हणत आम्हाला मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाण करताना त्यांनी माझ्या लहान बहिणीचा हात ओढला आणि तिला ओढत घेऊन जायला निघाले. दरम्यान मी वाचवण्यासाठी गेले तर माझ्या डोक्यात कुऱ्हाड टाकली, त्यानंतर मी तसंच पोलिस स्टेशनला पळत गेले. परंतु पोलिसांनी मला मदत केली नाही.

हल्ला करणाऱ्याच्या हातात दांडगे, कोयते, कुऱ्हाडी होत्या अस पीडित व्यक्तींनी सांगितलं.या मारहाणीत महिला ही जखमी आहेत त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे. मारहाण कोणी केली अद्याप समोर आले नाही. जीव वाचवण्यासाठी महिलांनी मोठ्याने आरडाओरडा केला, मदतीसाठी किंकाळ्या फोडल्या, पण हल्लेखोरांनी मारहाण करणं सुरूच ठेवलं. त्यांनी थेट डोक्यावर, पाठीत आणि पायांवर वार केले. या हल्ल्यात सर्व महिलांना दुखापत झाली. या प्रकरणात शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.सतीश भोसले उर्फ खोक्या भाई हा शिरूर कासार तालुक्यातील झापेवाडीचा रहिवासी आहे. गेल्या पाच वर्षांपासून तो राजकारणात सक्रिय आहे आणि त्याची ओळख भाजप आमदार सुरेश धस यांचा जवळचा सहकारी म्हणून आहे. सतीश भोसलेवर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.

## मा. जि. प सदस्य

आदर्श व्यक्तिमत्व होते. स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांचे ते अखंड विश्वासू आणि सहकारी होते.ते सलग १५ वर्ष जिल्हा परिषद सदस्य आणि सरपंच , उपसरपंच पदाचा कार्यकाळ घोषावला.सर्व समाजांना सर्वांना सोबत घेऊन चालणारे तात्या होते.ङ्ग एक आदर्श जीवन कुठलाही पक्षपात न करता कोणाचीही बाजू न घेता निपक्षपातीपणाने संयमाचा आणि राजकारणाच्या पलीकडचं समाजकारण करण्याची त्यांची खुप ओढ. समाजकारण,राजकारण आणि गावच्या प्रत्येक माणसाचे त्यांचे अतूट संबंध होते. धार्मिक क्षेत्रात गावातल्या कोणत्याही मंदिराचे बांधकाम असो कोणताही कार्यक्रम असो किंवा सप्ताह असो तात्यांनी गावकऱ्यांना सर्व समाजाला सर्वांना सोबत घेऊन ही समाजसेवा आणि गावची सेवा तात्यांनी केलेली आहे. गावातील कुठलेही काम कोणाचेही असू द्या अथवा पोलीस स्टेशनचे सर्व जबाबदारीचे काम असू द्या तात्यांनी कधी दुजाभाव न करता सर्वांचे कामे केली आहे. तात्या हे कार्यकारी अभियंता शिवप्रसाद खेडकर आणि चेतन खेडकर यांचे वडील होते.त्यांच्या पश्चात दोन मुले-सुना, चार मुली-जावई तसेच नातवंडे,पुतणे असा मोठा परिवार आहे . त्यांचा अंत्यविधी टाळ मृदंगाच्या गजरात दिनांक १२ऑक्टोबर २०२५ रविवारी सायंकाळी चार वा.च्या सुमारास चकलांबा येथे करण्यात आला. तसेच त्यांच्या अंत्यविधीला चकलांबा आणि चकलांबा परिसरातून विविध क्षेत्रातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता. तसेच उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहून आनंतात विलीन करून तात्यांना शेवटचा निरोप दिला. तात्याच्या जाण्याने सर्व चकलांबा आणि परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.